अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# निवडणूक आणि निसर्ग अंदाज अपने अपने

निवडणुकांचा शेवटचा टप्पा सुरू असून प्रामुख्याने उत्तर प्रदेशामध्ये प्रचाराला उधाण आलेले आहे. तर दुसरीकडे उन्हाळ्याचा शेवटचा महिना सुरू झाला असतानाच वातावरणामध्ये असेच वेगळे तुफान जाणवू लागले आहे. निवडणूक असो किंवा निसर्ग असो. इथे केवळ अंदाजच बांधता येतात. निश्चितपणे केव्हा काय घडेल हे कोणीही सांगू शकत नाही. महाराष्ट्रात गेल्या महिनाभरापासून कोणत्या ना कोणत्या भागामध्ये पाऊस गारपीट सुरू आहे. आता मुंबईनेदेखील अचानकपणे परवाच्या संध्याकाळी अचानक उद्भवलेल्या वाऱ्यांचा आणि काही ठिकाणी पडलेल्या पावसाच्या शिडकाव्याचा अनुभव घेतला. कोणतीही पूर्वकल्पना नसताना किंवा अंदाजही नसताना आलेले हे वादळ आणि पाऊस अनेक मुंबईकरांची तारांबळ करणारे ठरले. हवामान खात्याने यंदा पाऊस उशिरा येईल आणि गेल्यावर्षीच्या सरासरीपेक्षा तो कमी असेल अशा प्रकारचा अंदाज व्यक्त केला आहे. परंतु गेल्या महिनाभरापासूनची हवामानाची एकूण परिस्थिती पाहिली तर उलट यंदा पाऊस लवकर येईल आणि तो भरपूर असेल अशीच लोकांना शक्यता वाटत आहे. हवामान खात्याचे अंदाज हे शंभर टक्के खरे ठरत नाहीत हे आतापर्यंत सिध्द झालेले आहे. परंतु त्या अंदाजामुळे साधारणपणे परिस्थिती काय राहील याची फक्त माहिती मिळू शकते. गेल्यावर्षीच अशा प्रकारे हवामानामध्ये मोठे बदल दिसत नव्हते. गारपीट किंवा वादळाच्या घटना फारशा घडल्या नव्हत्या. कोकणात आलेले फयान नावाचे वादळ सोडले तर ज्याप्रमाणात या वर्षी राज्यांच्या अनेक भागात जी गारपीट होत आहे. तशी गेल्यावर्षी नव्हती. म्हणून या वर्षीची एकूण हवामानाची दिशा ही थोडी वेगळ्याच पध्दतीची आहे असे वाटू लागते.चक्क एप्रिल किंवा मे महिन्यामध्ये जिथे रणरणत्या उन्हाची शक्यता असते त्या भागातसुध्दा गारपिटीचे तडाखे बसत आहेत. उन्हाच्या झळांनी माणसे जनावरे शेकून निघतात. त्या वैशाख वणव्यामध्ये एखाद्या दिवशी कडक ऊन जाणवते तर पुढच्या दोन चार दिवसांमध्ये अचानक गारवा जाणवू लागतो. परिसरात आजूबाजूला कुठेतरी पाऊस तरी पडलेला असतो किंवा गारांचा मारा झालेला असतो. या सगळ्या घटना हवामानाच्या बेभरोशेपणाचीच लक्षणे ठरतात. त्याठिकाणी यंदाचा पाऊस किती पडेल काय पडेल केव्हा पडेल याविषयी कोणीच काही निश्चितपणे सांगू शकत नाही.

## गेल्या वर्षीपेक्षा वेगळे हवामान

आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून काही निष्कर्ष हवामान खाते काढत असते, त्याचबरोबरीने देशाच्या अनेक भागात किंवा महाराष्ट्रातसुध्दा परंपरागत पध्दतीने पावसाचे ठोकताळेदेखील वर्तवले जातात. त्यामध्ये एकूण निसर्गातला बदल प्राण्यांच्या पक्षांच्या हालचाली याच्या निरीक्षणावरून काही गोष्टी नोंदल्या जातात. विशेषतः सगळ्या सृष्टीचाच कारभार पाऊसमानावर अवलंबून असतो. म्हणून वैशाख महिन्याच्या किंवा मे महिन्याच्या शेवटच्या टप्प्यात याच सृष्टीतल्या काही बदलांचे निरीक्षण केले जाते. त्यावरून पाऊस पाण्याचा ठोकताळा सांगितला जातो. एकीकडे विज्ञानाच्या आधारावर काम करणाऱ्या वेधशाळा पाऊस उशिरा आणि कमी पडण्याचे संकेत देत आहेत. तर दुसरीकडे पक्षी आणि प्राण्यांच्या निरीक्षणावरून यंदा पाऊस वेळेवर आणि भरपूर पडण्याची ग्वाही दिली जात आहे. त्यातला सहजपणे लक्षात येणारा प्रकार म्हणजे ज्यावेळेला अनेक पक्षी झाडांवर घरटी बांधायला सुरुवात करतात त्यावेळेला ते जर मे महिन्याच्या सुरुवातीला किंवा मध्यावर घरटी बांधायला सुरुवात करत असतील तर त्यांची ही हालचाल किंवा तयारी पाऊस लवकर येण्याचे संकेत देतात. त्याबरोबरच पक्षांनी बांधलेली घरटी जर झाडांच्या मध्यभागी असतील म्हणजेच शेंड्यावर किंवा टोकावर ही घरटी नसतील तर पाऊस भरपूर असल्याचेही मानले जाते. कारण या मुसळधार पावसामध्ये आपली घरटी टिकली पाहिजेत म्हणून ती झाडाच्या मध्यभागी बांधली जातात आणि जर पक्षांनी ही घरटी उंच टोकावर किंवा फांद्यांच्या अग्रभागावर बांधली असली तर यंदा पाऊस कमी आहे, याचे ते सूचक मानले जाते. यंदा मात्र पक्षांची घरटी झाडाच्या मध्यभागी बांधायला सुरुवात झाली आहे आणि ती आतापासूनच दिसत असल्यामुळे या गोष्टी पावसाच्या लवकर आगमनाच्या वार्ता देणाऱ्या ठरतात. पाऊसमानाचा हा दिलासा निश्चितच सुखावह ठरतो. अर्थातच हे सगळे प्रकार अंदाज म्हणूनच लक्षात घ्यावे लागतात. सध्या तर हवामानाच्या या बदलाकडे लोकांचे किंवा एकूण सत्ताधाऱ्यांचे राजकारण्यांचे फारसे लक्ष नाही. निवडणुकीच्या निकालामध्ये प्रत्यक्ष काय घडते याकडे सगळ्यांचे डोळे लागलेले आहेत. आतापर्यंतचे अनेक अंदाज व्यक्त झालेले आहेत.

## गारपीट आणि मारपीट

तापलेले राजकीय वातावरण आणि उन्हामुळे जाणवणारा तडाखा याचा अनुभव घेत असतानाच एका क्षेत्रात मारपीट तर दुसऱ्या क्षेत्रात गारपीट असे चित्र पहायला मिळते. कारण निवडणुकीच्या निमित्ताने वेगवेगळ्या पध्दतीने मारपिटीचाच प्रकार दिसून येतो. तर कोणतीही पूर्वसूचना न देता वातावरणात गारपीट पहायला मिळत आहे. यावरून नक्की काही सांगता येत नसले तरी हवा कोणत्या दिशेने वाहत आहे एवढाच अंदाज घेता येतो. राजकीय हवामानात सत्तांतराचा अंदाज आहे तर निसर्गाच्या वातावरणात बेभरोशाची परिस्थिती आहे.तरीदेखील हवामान खात्याने पाऊस कमी पडेल असे सांगून अनेकांना काळजीत टाकले. मात्र सध्याची एकूण वादळवाऱ्याची परिस्थिती पाहिल्यावर यंदाचा पाऊस लोकांना फारसे नाराज करणार नाही असे म्हणायला जागा उरते. एक गोष्ट मात्र खरी आहे. अनेक बाबतीत स्थित्यंतर किंवा परिवर्तन घडवण्याची किमयासुध्दा नियतीच निश्चित करत असते. मग ते सत्तांतर जरी असले तरी तो नियतीचाच भाग ठरतो आणि वातावरणातले वादळवारे असले तरी तोसुध्दा नियतीनेच टाकलेला डाव असतो. एवढे जरी समजून घेतले असले तरी मनुष्याला आपल्या शक्तीच्या आणि बुध्दीच्या मर्यादा आहेत हे लक्षात येऊ शकते.अंदाज हेच त्याचे अनेक वेळेला आधार ठरत असतात.